# ग्रंथालय आज्ञावली

## १. कार्यवाहीवृत्ते माहिती पध्दती आज्ञावली- DIS (Debates Information System) Software:

विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या कार्यवाहीवृत्तांची अनुक्रमाणिका (Index) व संबंधित कार्यवाहीवृत्तांची पृष्ठे व त्याव्दारे देण्यात यावयाच्या संदर्भसेवांचे संगणकीय नियंत्रण करता यावे यासाठी ही आज्ञावली विकसित करण्यात आली आहे.

या आज्ञावलीत विधानसभेचे १९३७ ते २००१ व विधानपरिषदेचे १९३७ ते २००२ पर्यंतचे कार्यवाही वृत्त यांची पाने स्कॅन करून व त्यांच्या अनुक्रमाणिकेतील माहितीचा डेटाबेस तयार करण्यात आला आहे.

## २. पुस्तके व नियतकालिके माहिती पध्दती आज्ञावली- Libsys Software:

ग्रंथालयातील नित्याची कामे उदाहरणार्थ पुस्तके व नियतकालिके पसंती तत्त्वावर घेणे, खरेदी केलेल्या पुस्तकांवर तांत्रिक सोपस्कार करणे व त्यांची देव-घेव इत्यादी करण्यासाठी व त्याव्दारे माहिती देण्यासाठी तसेच, पुस्तकांतील व नियतकालिकांतील लेखांचा विषय, लेखक, शिर्षक, शिर्षकातील महत्त्वाचे शब्द, आवृत्ती, प्रकाशक, प्रकाशन वर्ष व महिना, वर्गांक, (विषय क्रमांक + लेखकाचे नाव) पृष्ठे इत्यादींची माहिती या आज्ञावलीव्दारे नोंद करण्यात येऊन डेटाबेस उभारला जातो व या डेटाबेसव्दारे नोंद केलेले प्रत्येक पुस्तक व लेख व त्या अंतर्गत विषय वा अन्य विविध वा अन्य विविध बाबींच्या उपलब्धतेची माहिती प्राप्त होऊ शकते.

या आज्ञावलीव्दारे डिसेंबर, २०१९ पर्यंत सुमारे ६६,००० पुस्तकांच्या तसेच, सुमारे १३,००० नियतकालिकांतील लेखांच्या नोंदी भरण्यात आलेल्या आहेत.